REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 7 | APRIL - 2026

# "कन्नड तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास"

डॉ.शेख सुभान हसन
सहायक प्राध्यापक, मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, छत्रपती संभाजीनगर.

## ❖ प्रस्तावना :-



शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास महत्त्वाचा आहे कारण यामुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया सुधारते, त्यांना चांगले मार्गदर्शन मिळते, त्यांच्यात समीक्षात्मक विचार विकसित होतात, शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि पद्धतीचावापरकेल्यास शिक्षणाचा दर्जा उंचावतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व कुशल नागरिक तयार होतात. चांगल्या अध्यापन क्षमतेमुळे विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानच मिळत नाही, तर त्यांचे सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक कौशल्येही विकसित होतात, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होतो. प्रभावी शिक्षक विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शिकवतात, ज्यामुळे शिकणे सोपे आणि आनंददायी होते. अध्यापन क्षमतेच्या अभ्यासातून शिक्षक आधुनिक अध्यापन पद्धती आणि डिजिटल तंत्रज्ञान शिकतात, ज्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढते. शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श असतात. त्यांच्या शिकवण्याच्या कौशल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आणि स्वतःचे ध्येय गाठण्यासाठी प्रेरणा मिळते. शिक्षक विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी ओळखू शकतात आणि त्यावर उपाययोजना करू शकतात, ज्यामुळे शिक्षणातील समस्या दूर होतात. प्रभावी अध्यापनामुळे विद्यार्थी भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार होतात आणि देशाच्या प्रगतीत योगदान देतात. चांगले शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतःहून शिकण्यास आणि स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रोत्साहित करतात, जे दीर्घकाळ फायदेशीर ठरते.

**शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास म्हणजे** शिक्षकांमध्ये आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि वृत्ती विकसित करणे, जेणेकरून ते विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शिकवू शकतील; यात क्षमताधिष्ठित शिक्षण, व्यावसायिक विकास, आणि विद्यार्थ्यांच्या बोधनिक क्षमतेचा अभ्यास यांसारख्या घटकांचा समावेश होतो, ज्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारते आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो.

**शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास म्हणजे** शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टिकोन विकसित करण्याची प्रक्रिया आहे, जेणेकरून ते प्रभावी शिक्षण देऊ शकतील आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधू शकतील

**शिक्षकांची अध्यापन क्षमता म्हणजे**, विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये प्रभावीपणे शिकवण्यासाठी शिक्षकाकडे असलेले ज्ञान, कौशल्ये आणि क्षमतांचा संच होय, ज्यात विषय ज्ञान, शिकवण्याच्या पद्धती (अध्यापनशास्त्र), विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यांना प्रेरित करणे, कृतीशील अध्ययनाला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे यांचा समावेश असतो. यात केवळ माहिती देणे नसून, विद्यार्थ्यांच्या आकलनापासून ते उपयोजनापर्यंतच्या बौद्धिक प्रक्रियांचा वापर करणे अपेक्षित आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडतील

## ❖ उद्दिष्टये :-

➢ माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास करणे

- माध्यमिक शाळेतील पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास करणे

## ❖ परिकल्पना :-

- माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे
- माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे
- माध्यमिक शाळेतील महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे
- माध्यमिक शाळेतील पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेत सार्थक फरक आढळून येत नाही.

## ❖ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-

- संबंधितसंशोधन हे कन्नड तालुक्या पुरते मर्यादित आहे.
- संबंधितसंशोधन हे माध्यमिक शाळेतील शिक्षकांशी संबंधितआहे.
- संबंधितसंशोधन हे माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेशी संबंधितआहे.

## ❖ संशोधन पद्धती : -

संबंधित संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## ❖ लोकसंख्या :-

कन्नड शहरातील माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक हि सदरील संशोधनाची जनसंख्या आहे

## ❖ नमुना :-

कन्नड तालुक्यातील दहा माध्यमिक शाळेतील प्रत्येकी ०५ पुरुष व ०५ महिला शिक्षक अश्या एकूण १०० शिक्षकांची सुगम यादृक्षिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली.

## ❖ माहिती संकलनाचे साधन :-

संबंधित संशोधनामध्ये माध्यमिक शिक्षकांकडून माहिती संकलनासाठी बी.के.पासी व एम.जे.ललिता यांची प्रमाणित सामान्य अध्यापन क्षमता चाचणी वापरण्यात आली आहे.

## ❖ प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

**सारणी क्रमांक – ०१**

**अध्यापन क्षमतेचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अंक क्रमांक | प्राप्तांकांचा विस्तार | अध्यापन क्षमतेचा स्तर |
|---|---|---|
| १ | २१-६२ | कमी |
| २ | ६३-१०४ | साधारण |
| ३ | १०५-१४७ | उच्च |

**सारणी क्रमांक – ०२**

**माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे मध्यमान व अध्यापन क्षमतेचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अं.क्र. | चल | गट /लिंग | विदयार्थी संख्या | मध्यमान | अध्यापन क्षमतेचा स्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अध्यापन क्षमता | पुरुष व महिला शिक्षक | १०० | १०७.९० | उच्च |
| | | पुरुष शिक्षक | ५० | १०६.४८ | साधारण |
| | | महिला शिक्षक | ५० | १०५. ९७ | उच्च |

**सारणी क्रमांक - ०३**

**माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे मध्यमान, प्रमाण विचलन, प्राप्त टि मूल्य, स्वाधीनता मात्रा , प्रमाणित टि मूल्य व सार्थकता इत्यादी दाखवणारी सारणी.**

| अं. क्र. | चल | गट | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | प्राप्त टि मूल्य | प्रमाणित टि मूल्य (०.०५ ) | प्रमाणित टि मूल्य (०.०१) | सार्थक / असार्थक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अध्यापन क्षमता | पुरुष शिक्षक | १०६.४८ | ८.७६ | ९८ | ०.५१ | १.९६ | २.५७ | **असार्थक** |
| | | महिला शिक्षक | १०५. ९७ | ७.३५ | | | | | |

## ❖ परिकल्पना पडताळणी :-

➢ **माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - १०७.९० आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे

➢ **माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे**

माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - १०६.४८ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार साधारण आहे त्यामुळे संबंधितपरिकल्पनेचा त्याग करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर साधारण आहे

➢ **माध्यमिक शाळेतील महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे**

माध्यमिक शाळेतील महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - १०५.९७ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च आहे त्यामुळे संबंधितपरिकल्पनेचा स्विकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि माध्यमिक शाळेतील महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर उच्च आहे

➢ **माध्यमिक शाळेतील पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेत सार्थक फरक आढळून येत नाही.**

माध्यमिक शाळेतील पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेतचा तुलनात्मक अभ्यास केला असता सारणी क्रमांक ०३ नुसार पुरुष शिक्षकांचे मध्यमान १०६.४८ व प्रमाण विचलन ८.७६ आले आहे तर महिला शिक्षकांचे मध्यमान १०५.९७ व प्रमाण विचलन ७.३५ आले आहे या मध्यमानातील फरकाची सार्थकता ०.०५ व ०.०१ स्तरावर तपासली असता प्राप्त टि. मूल्य ०.५१ आहे जे प्रमाणित टि. मूल्य १.९६ व २.५७ यापेक्षा कमी असल्याने मध्यमानात सार्थक फरक आढळून येत नाही म्हणून संबंधित परिकल्पनेचा

स्वीकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक शाळेतील पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेत सार्थक फरक आढळून येत नाही

## ❖ मुख्य निष्कर्ष :-

- माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर **उच्च** आहे
- माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर **साधारण** आहे
- माध्यमिक शाळेतील महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा स्तर **उच्च** आहे
- माध्यमिक शाळेतील पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेत **सार्थक फरक आढळून येत** नाही.

## ❖ समारोप :-

अश्या प्रकारे शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा अभ्यास करण्यात आला संबंधित संशोधनाचे निष्कर्ष बघता माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकाची अध्यापन क्षमता साधारण, महिला शिक्षकाची अध्यापन क्षमता उच्च तर पुरुष व महिला शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास केला असता यामध्ये फारसा फरक दिसून आला नाही. शिक्षकांची अध्यापन क्षमता हा एक निरंतर चालणारा आणि बहुआयामी प्रक्रिया आहे. प्रभावी अध्यापन हे शिक्षक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. या अभ्यासाचा उद्देश शिक्षकांना अधिक सक्षम बनवून, शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करणे हाच आहे

## ❖ संदर्भ :-


- https://education.vikaspedia.in/viewcontent/education/teachers-corner/
- https://iris.peabody.vanderbilt.edu/mr/module/ef1/cresource/q1/p02/
- https://marathivishwakosh.org/65667/
- http://mahazpteacher.blogspot.com/p/blog-page_88.html
- https://en.wikipedia.org/wiki/Competency-based_learning
- https://ycmou.ac.in/media/publication/ycmou
- https://thinkmaharashtra.com
- https://www.highspeedtraining.co.uk/hub/what-is-effective-teaching/
- https://www.slideshare.net/slideshow/competency-based-learning-ppt-250008559/250008559